
साहित्य प्रतिष्ठान
सुप्रिया मिलींद जाधव [जोशी]
सई
सईची वही
काही पानं निसटलेली
सत्य घटनेवर आधारित....

# काय म्हणावे ???

गंधित तरीही शापित नारी......
घरी-दारीच्या अवहेलनेला काय म्हणावे ???

जननी असुनी उपेक्षिताही........
तना-मनाच्या व्याकुळतेला काय म्हणावे ???

स्वतंत्र तरीही आश्रीत नारी......
पारतंत्र्याच्या जोखाडाला काय म्हणावे ???

सुंदर तरीही सुशोभित ती.......
असहाय्यश्या विवशतेला काय म्हणावे ???

स्वयंभु तरीही अर्पित नारी......
जन्म-मरणाच्या या फ़ेऱ्यांना काय म्हणावे ???

सुप्रिया मिलींद जाधव (जोशी)
पुणे

# मनोगत......

खरं तर मला अस वाटत कि सईच्या मनोगताहून वेगळं अस काय सांगणार मी माझ्या या दोन-चार वाक्यात?

## सई !!!

मध्यंतरी माझा वरचेवर नाशिक – पुणे असा प्रवास झाला, एके सकाळी प्रवासात, पेपर मधील एका बातमीने लक्ष वेधून घेतले, हृदयद्रावक सत्य घटना होती ती....नि माझ्याही नकळत, त्याच क्षणी सईची बिजे कुठेतरी माझ्या मनात खोलवर रुजली गेली असावीत...

काही काळ लोटल्यावर असाच फूस लावून लग्नाला बळी पाडण्याचा एक प्रकार मी अगदी जवळून अनुभवला... तिची ती हतबलता, होणारा कोंडमारा, समाजाचा तिच्याकडे, तिच्या घरच्यांकडे पहाण्याचा दृष्टीकोण...एका घडून गेलेल्या चुकीचे जे काही परिणाम ती भोगत होती...यातून सई माझ्या मनातून लेखणीत झिरपत गेली...पण हे झाल गद्य...हे लिहिताना माझ्यातली कवयित्री मला काही केल्या स्वस्थ बसू देईना...अशा रितीने प्रसंगानुरुप कविता सुचत गेल्या...नि निखळलेल्या पानात अडकल्या...

काही दिवसांपूर्वीच मी माझ्या आईला, जी ७२ वर्षांची आहे सई वाचून दाखवली नि काय आश्चर्य ! तिही कुठल्या ना कुठल्या प्रसंगात स्वतःला शोधू लागली..आणि हेच या कथेच मी मोठ यश समजते. हे कथानक जरी सत्यघटनेवर आधारीत असले तरीही त्याचा विस्तार मात्र  पूर्णतः काल्पनिकच आहे.

अगणित लोकांच्या प्रोत्साहना खेरीज नि सहकार्याशिवाय सई रंगरुपास येणे केवळ अशक्यप्रायच होते .मी त्या प्रत्येकाची शतशः ऋणी आहे.

सईची वाटचाल कशी वाटली हे जरुर कळवा....



सुप्रिया मिलींद जाधव (जोशी)
पुणे
संपर्क - ९४२३१९१३५९
ईमेल - supriya.jadhav7@gmail.com

# प्रकाशकाचे शब्द......

सुप्रिया मिलींद जाधव (जोशी) यांना आपण ई स्टाप या विनोदाला वाहिलेल्या ई नियतकालिकाच्या संपादिका म्हणून ओळखतो. खुसखुशीत शैली आणि मार्मिक पंच हे त्यांच्या लिखाणाचे अंग मला माहित होते. त्यानंतर वाचल्या त्या त्यांच्या कविता आणि गझल. पण "सईची वही" मात्र त्यांच्यातल्या कथाकाराची ओळख करून देते.

"काव्याच्या आभूषणांनी नटलेली कथा". "सईची वही" चं वर्णन मी असं करतो. कथा आहे लग्नाच्या भूलथापांनी फ़सवणूक झालेल्या एका मुलीची; सईची. तिची भावनिक उलथापालथ , उचंबळ, आशा, निराशा, विश्वासघात यांची. एक प्रातिनिधीक सर्वसामान्य मुलगी. तिच्या माफ़क अपेक्षा. मोहक साधी स्वप्नं...

कुबेराच्या तिजोरीची ना आस फ़कीराला...

फ़ाटकी झोळी ! अन झोपडी थाटली माझी !

पण तिच्या भावनांचं आंदोलन रेखाटलं आहे ते मात्र सामान्य नाही. आत्यंतिक तीव्र भावनांचे चित्रण करताना सुप्रियाने कवितेचा आधार घेतला आहे. आणि तिच्या मनातली खळबळ सौंदर्यपूर्ण जोरकसपणे मांडली आहे. त्यातलं बेभान हरवणं नेमकं टिपलं आहे.

श्वासात तुझिया झंकारुनी श्वास माझा ,

झणी हरखले मी जराशी जराशी !

मिठी माळीली मी तुझी भोवताली ,

अन शहारले रे उभीशी उभीशी

या ओळींतून हे जाणवतं.

मात्र या भावुकतेला वास्तवाचा स्पर्श होण्याचा क्षणही चपखलपणे उभा केला आहे. त्याला शब्दबंबाळपणा नाही. एकाच शब्दात सारं सार मांडण्याची हातोटी इथे जाणवते.

एक नंबरी , बावन्नकशी...
समजून घातलं ,
पाणी लागताच..
पाणी कळलं !

अर्थात सुप्रिया केवळ शब्दांच्या खेळात रमत नाही. इंद्रधनुष्यातले रंग जसे अलगदपणे बदलतात तसे सईच्या कथेचे भावही बदलतांना जाणवतात. अलगद. गुलाबी रंगाचा पालट होऊन तो लालभडक कधी होतो ते कळतच नाही. काळया रंगाचा पड्दा बाजूला सरून उजळ प्रकाश अचानक उभा होतो. सारं अलगद.

सुप्रियाच्या या कवितांवर गझलचा प्रभाव जाणवतो. मात्र गझलचं व्याकरण आत्मसात करण्यापूर्वीच्या या कविता आहेत. अर्थाची बाजू सांभाळताना क्वचित छंदाकडे दुर्लक्ष झाल्याचंही जाणकारांना जाणवेल. मात्र या कवितांचा एक सामाजिक उद्‌बोधनाचा उद्देश आहे. तो मात्र पुरेपूर सफ़ल झाला आहे यात दुमत नसावं. आणि यासाठी सुप्रियाचं करावं तेवढं अभिनंदन कमीच आहे.


लखलखली दामिनी ...अन भस्म झाले क्षुद्रही ,
सत्य-असत्याच्या रणी...सत्यचं जिंके शेवटी !!!

हा संदेश आजच्या तरूण पिढीने ध्रूवताऱ्याप्रमाणे समोर ठेवावा असा आहे. अजून कोणाच्या वाट्याला अशी निखळलेल्या पानांची वही येऊ नये.

बस्स !

**ई साहित्य प्रतिष्ठान**

प्रकाशक आणि वितरक


विश्वासघात
He loves me
Sorry
आई बाबा



“तळ्यात कि मळ्यात...”

“तळ्यात कि मळ्यात...”

कलती मान झोकदार

कमरेवर हात...

आपल्याच तोऱ्यात !

तेच ते अंगण...

त्याचा आजही तोच रुबाब...

हरपलेलं बाल्य...

गळून पडतोय आठवांचा नकाब !



मी तर तळ्यात...हो...हो...तळ्यातच पडले होते... तूच तर ढकललं होतस...अगदी निष्ठूरपणे ! आणि आता तूच का रडतोयस असा...

मी नाही मेले म्हणून...कि शुध्दीवर आलेय म्हणून ??? अं ???

.


बघ ना ,एकाचं अनुभवानें या किती उलथापालथ घडलीय एकसूरी आयुष्यात माझ्या...जशी एका जोरदार हिसड्याने सुबक मोत्यांची माळ पूरती विखरुन जावी.....एक एक मोती पकडायला जावा तसतसा तो अजूनच घरंगळत जावा हातातून... पुढे-पुढे......

हं !!!

.........

विखरुन गेले !!!

सई
११/८/०९



कोण जाणे का असे घडून गेले ?
वर्ख विश्वासाचे पार वितळून गेले !

कोणता चेहरा ईथे मानू खरा मी ?
भेटले जे जे - ते ते असे बुडवून गेले !

हे खरे कि चुकलेच मी ही ओळखाया ,
जाणीले तेव्हा आयुष्य हे सरुन गेले !

अफ़वाच माझी पोहोचली जिथे-तिथे ,
पारखाया सत्यता भले-भलेही विसरुन गेले !

कोण माझे मी कुणाला साद घालू ?
जे-जे आले ते पायदळी तुडवून गेले !

सरतेशेवटी अलिप्तशी झाले जरी मी ,
वर्तमान माझे भविष्यही विखरुन गेले !!!

नर्सने पडदा सरकवला खिडकीवरचा...
नि कोवळ्या किरणांनी हजेरी लावली.

हं !!!

डोळ्यांवरचा पडदा तर...तर.. केव्हाच उतरला होता म्हणा! तू दिलेली वचनं.... प्रेमाच्या आणा-भाका... भविष्याची पाहिलेली स्वप्न.... सारं-सारं क्षणातं धुळीस मिळालं !



निशिगंधाचा तो दरवळ... नि झरोक्यातली ती नाचरी सप्तरंगी किरणे... जणू सांगत होती...कि , कि...तरीही उभी रहा मनातल्या अंधाराचं सावट दूर सारुन... आयुष्य सप्तरंगी आहे...या कटू-गोड अनुभवांची झालर लावून ते सुसहाय्य कर!!!

'आलीया भोगासी रहावे सादर !'

तसंही म्हणतातच ना स्व-अनुभवासारखा सच्चा गुरु नाही दुसरा या जगात... पण...पण.....एका अर्थी जे काही झाले ते बरेच झाले...
.
क्षणभंगुर जिंदगी गं... मी तुला जगून आले !!!

सई
१२/८/०८



कोण मैफ़िलीत माझ्या... आले नि... निघून गेले ?
कोष चांदण्यांचे... का असे झुलवून गेले !

स्पर्शता वाऱ्यास तू... ते वाहणे विसरुन गेले ,
घुसमटले मी इथे... ते प्राणवायू लेवून गेले !

बोलणे बोललो जरी... नेमके तेच राहुन गेले ,
जाम मदिरेचे... नयनी माझिया... झलकुन गेले !

तोडणे सहजी मला... तु असे जमवुन नेले ,
हरेक शेर माझे... दर्द नवा... रिचवून आले !

गोषवारा काढता...जाहले ते बरेच झाले...
क्षणभंगुर जिंदगी गं... मी तुला जगुन आले !!!

ए ! बघ ना...

इतकं सारं घडुन गेलं पण..पण..कुणाला काही खबर ??? झाल्या (सत्य) घटनेची... अं ?

तुझे मित्र माझ्या मैत्रिणी ...तुझे - माझे नातेवाईक... आणि हो ...पोलिस ???

किती बेमालुमपणे वठवतोय नं हे सगळं नाटक आपण दोघेही ...त्या दिवशी पुलावरून दिसणा-या त्या तळ्यातल्या संथ पाण्यासारखं !



पुढच्या क्षणी कोण खळबळ उडणार आहे ह्याची तसुभरही कल्पना नसेलं ना रे...त्या तळ्याच्या स्तब्धतेला...

असो !!! कालचे तुझे ते अश्रु जरी ग्लिसरीनवाले होते तरीही ती...ती...तुझ्या डोळ्यात तरळुन गेलेली मुर्तिमंत भिती, ती मात्र किती खरी-खुरी होती नं?

ए ! अगदी अश्शीचं ग्रासली असेल ना रे भिती...माझ्याही डोळ्यात... पाण्यात गटांगळ्या खाताना...

अं ???

प्रतारणा !!!

13/8/08



थिजले पाऊल ...प्रीती आटली माझी ,
विश्वासाशी नाळ...केव्हाच तुटली माझी !

क्रांतीकारी विचारांची का केली अंमलबजावणी मी ?
तराजूंनी त्यांच्या त्यांनी नियत तोलली माझी !

कुबेराच्या तिजोरीची ना आस फ़कीराला...
फ़ाटकी झोळी ! अन झोपडी थाटली माझी !

तत्वांना माझ्या ठेविले प्रज्वलीत श्वासांनी ...
समिधा रक्ताची , आहुती माझ्या आयुष्याची !

तुजसाठी सारा अट्टाहास! जाहले होते रे तुझी...
ऊल्कापात प्रतारणेचा .....राख उडे ह्रदयाची

०८ / ०८ / २००८ माझ्या आयुष्यातला अविस्मरणीय दिवस !!!

सगळी गणितं तूचं मांडलेली... आठवतयं ? तारीख , महिना , वर्षातचं फ़क्त ८ आकडा नव्हता..... तर ह्या सगळ्यांची बेरीजही ८ चं येत होती... मलाही त्याच दिवशी १८ पूर्ण झालेली... आणि ‘८’ हा तुझा लकी नंबर !



त्या दिवशीचं आपण कोर्ट-मॅरेज केलं !!! कॉलेज बुडवून आलेली मी..अन गेट-पास काढुन आलेला तू.. हिरव्याकंच्च शालूचा भार सावरत... आणि... आणि... कोपरभर हिरवा चुडा खणकावतं...

तुझ्या डोळ्यातले ते विश्वस्त भाव न्याहाळत... झोकदार सही ठोकलेली होती मी... कु. ची सौ. झालेली !!! तुझ्या-माझ्या मोजक्याचं मित्र-मैत्रिणी... छोटीशी पार्टी !

(निलुकडे रहायला जातेय असे आईशी पहिल्यांदी खोटं बोलून उंबऱ्याबाहेर पडलेली मी...)

आपल्या मित्र-मैत्रिणींनी तर केली होती ती सारी व्यवस्था एक मेमोरेबल सरप्राईज गिफ़्ट म्हणून!

थोडीशी उत्सुक....बरीचशी बावरलेली...
ती पहिली रात्र !!!

आजही मी शहारतेय नखशिखांन्त त्या आठवणींनी... फ़क्त तु नि मी...नि तो सुखद एकांत...मंतरलेला !


माझ्या अणुरेणुची होणारी ती थरथर... तुझ्या ऊष्ण ऊबदार तळव्यांच्या स्पर्शात विरुन गेली होती जणु ! किती विश्वासाने विसावले होते रे मी तुझ्या त्या भारदस्त छातीवर...आणि माझ्या डोळ्यांतून गालावर झरझरणारे ते अश्रु ...अलगदपणे टिपले होते तुझ्या ओठांनी....



ईतकी तृप्त झाले होते मी , कि वाटत होत... हाच ...हाच तो क्षण ज्याची मी युगानुयुगे वाट पहात होते... आता मृत्यु आला तरी बेहत्तर हसतमुखाने सामोरी जाईन !

जणु एक कळी उमलली होती त्या रात्री... गुलाबी-गुलाबी !!!

१४/८/०८



नजरभेट होता...लववुनी पापणी ही ,
आरक्त मी ही गुलाबी-गुलाबी !

श्वासात तुझिया झंकारुनी श्वास माझा ,
झणी हरखले मी जराशी जराशी !

मिठी माळीली मी तुझी भोवताली ,
अन शहारले रे उभीशी उभीशी !

तुझी रागिणी मी... तु चंद्र माझा ,
चढे रात आता नशीली नशीली !

निळ्या सावळ्या तु बरसला असा कि ,
पहा उमलले मी
पुन्हाशी पुन्हाशी !!!

किती मोहरले होते रे मी तुझ्या त्या स्पर्शाने !!! जसा आंब्याचा मोहोर दरवळतो पूर्ण आमराईत... जसा रातराणीचा मत्त दरवळ धुंद करून जातो आख्ख्या रात्रीस... प्राजक्त बहाल करून जातो पावित्र्य पहिल्या प्रहरास...नि धरित्री झळाळून उठते पावसाच्या पहिल्या वहिल्या सरीने अगदी तशीच !!



माझ्या मनातली अपराधीपणाची टोचणी किती सहजतेने दूर सारली होतीस रे तू... म्हणला होतास...थोडीशी कळ काढ राणी...एखादया वर्षाचा तर प्रश्न आहे हा...वर्षभरात माझ्या दादाचंही लग्न होईल... माझंही मस्त प्रमोशन होईल...नि मग अभिमानानं येईन मी माझ्या राणीला वाजत-गाजत घेवून जायला.. मिरवत मिरवत.

हं!!! हा सगळा साज निलुकडेच उतरवून... जड पाऊलांनी मी माझं नि तू तुझं गाठलेलं घर ! एक हवीहवीशी हुरहुर मागे ठेवून ....! त्या कोऱ्या बेंटेक्सच्या मंगळसुत्राचंही कोण कौतुक मला! उतरवून ठेवताना ते मात्र खुप जड गेल होत... पण... पण...आता समजुन चुकलंय रे...दुध ते दुध नि पाणी ते पाणीचं असतं बाकी... प्रेमाशिवाय प्रेमाचं प्रतिक ... शोभिवंत...दिखाऊ !!!

सई

१५/८/०९

!!! मंगळसुत्र !!!



बेंटेक्सचं मंगळसुत्र...
एक चमचमतं तंत्र !

एक नंबरी , बावन्नकशी...
समजून घातलं ,
पाणी लागताचं..
पाणी कळलं !

आठवतय मला...
कोण अट्टाहास केला,
भुलुन नक्षीला...
फ़शी पडले पाहिल्या-पाहिल्या !

काळे मणी त्यातले...
जिवापाडं जपले ,
तरीही बरेचं विटले...
उरले-सुरले तुटले !

नाही बदलवत...
नाही काढवत,
घालावच लागतं...
त्यावीण सत ना गत !

शेवटी-शेवटी उशिरानं उमगतं...
चमकतं ते सगळच सोनं नसतं!!!



बरोब्बर आठवडा उलटलाय त्या घटनेला....

डॉक्टर आईला सांगत होते...
आता तसं काळजीचं कारण नाही...
आऊट ऑफ़ डेंजर आहे परीस्थिती...
फ़क्त मानसिक धक्क्यातून सावरायला हवीय ही !


लहानपणी वाटायचं मला खूप-खूप ताप यावा.... नि मग आई-बाबांनी छ्जा घेवून माझ्या अवती-भवती करावं, मी आणि मीच फ़क्त केंद्रबिंदू असावा दोघांचाही... बाबांचा हात डोक्यावरून फ़िरताना खोलवर झिरपणारा त्यांचा तो प्रेमळ स्पर्श...नि आईच्या पदरातील ती ऊब...खूप खूप हवीहवीशी वाटायची ...

पण... पण...आत्ता चाललेली ही बाबांची तडफ़ड... आईचा जागरणाने , काळजीने काळा ठिक्कर पडलेला चेहरा..नाही... नाही...बघवत हे सगळं आता...

किती करंटी नं मी ???
एका घोडचुकीने त्यांच्या विश्वासाला पारखी झाले मी आज !

पोरके करून गेले !!!

सई
१६/८/०८



पुन्हा नवे दुःख...नव्याने छळून गेले ,
सुखाने दिला भोज्जा...नव्याने राज्य आले !

उगाळले मी जे-जे ते कोळसे निघाले ,
वफ़ादार निखारे...नव्याने पोळून गेले !

भान वास्तव्याचे...उधळून स्वप्न गेले ,
आभास सावल्यांचे वितळून चूर झाले !

दबक्याच हुंदक्यांनी गदगदुन अंग गेले ,
जे-जे वाटले आपुले ते-ते दुरुन गेले !

कोणावरी विसंबू...वारेचं न्यारे झाले ,
सुखही आयुष्याला आता पोरके करुन गेले !!!



खोटे बोलणे...काही लपून-छपून करणे... हा माझा पिंडच नव्हता... आम्हा भावंडांना आपापली मते मांडण्याचा समान हक्क! प्रसंगी आई-बाबाही त्यात हिरीरीने सामिल होत.

पण...
पण...तुझ्या त्या मनधरण्या... खरे बोलण्यातले कथित धोके.... आणि... आणि... तुला गमावण्याची अनामिक भिती.... ह्या सगळ्याला मीच शरण गेले...नि... नाईलाजाने अशा या भातुकलीच्या लग्नाला उभी ठाकले !

कुठतरी वाचलेलं...प्रेमात नि युध्दात सगळं माफ़ असतं म्हणे !

हो..पण.. आता आई-बाबांच्या डोळ्यातील प्रश्नांचं काय करू?
आज लगेचच नाही..पण कधीतरी..
कशी सामोरी जावू ???

.....हीच सल सलते नव्याने रोज आहे !

सई
16/8/09

पोकळ सारी नाती ...खुळा हा आभास आहे ,
स्वप्नाधीन गुलाब...प्राक्तन काटयांचीच शेज आहे !

ओळखू कशी मी कोण माझे 'खास' आहे ?
मोगऱ्याचाच दरवळ इथे निशीगंधासही आज आहे !

रणनिती जिथे-तिथे , ओठात-पोटात वेगळाले आहे ,
ज्याच्या हाती बंदुक ...नेमही त्याचाच दास आहे !

यशापयशाच्या दरबारी कैकयीचा बाज आहे ,
रामच आयोध्येस इथे पारखा आज आहे !

काय-कसे-किती लिहावे ? साराच भ्रमनिरास आहे ,
शब्दही बंदी.....हीचं सल सलते नव्याने रोज आहे !!!





जशी जशी माझ्या तब्येतीत सुधारणा होत जातेय... तस तशी भेटायला येणाऱ्या मित्रमैत्रिणींची वर्दळही कमीकमी जाणवतेय...

पण तू का दिसत नाहियेस कालपासून आलेला ?

आज तर मी मुद्दाम जागीच राहिलेय दुपारपासून.. तुझ्या येण्याकडे डोळे लावून...

बरं कुणाला विचारूही शकत नाही ना...
खुलेआम !

असा कसा रे तू तरी ???
खरच किती बदललास नं तू...

शॅमेलिऑन.....
रंग बदलत्या सरड्यासारखा!!!

कि दैवचं फ़िरलेय माझे ?

दैव !!!

सई
१८/८/०८

देवाविना देवालयी का मी उगा घोटाळले ,
गंधाविनाही त्या फ़ुलाच्या का अशी गंधाळले ?

मुर्तीस देव्हाऱ्यात माझ्या... आदरे प्रस्थापिले ,
ते प्राक्तनाचे घांव ताजे का तरी रक्ताळले ?

मंदावलेल्या त्या दिव्याला तेल ते ही घातले ,
घोंगावणाऱ्या वादळासी का कुणी सांभाळले ?

तोही चिडीचा डांव होता की तुझा तो नाद रे ,
नादान वेड्या त्या क्षणांनी मीच का छंदाळले ?

टाळोनि टाळीले जरी जे व्हायचे ते जाहले ,
कंठास आले प्राण आता दैवही कंटाळले !



का कुणास ठाऊक पण गेल्या दोन-एक
महिन्यांपासून वागण्या बोलण्यात तुझ्या
काहीतरी फ़रक नक्कीचं पडलेला...
टेन्स वाटायचास प्रत्येक भेटीत...
जुजबीच बोलायचास...

सागरतळीची खळबळ सुध्दा स्वार होत
असते लाटांवर... पण.. पण...तु मात्र
भावनांना दफ़न करुन स्तब्धचं
रहायचास.. कि तसं भासवायचासं ???

खोदुन-खोदुन विचारल कितीदा...
तुझा आपला एकचं घोषा...
कामाचा भार वाढलाय !

फ़ोन कॉल्स , मेल्सचीही टाळटाळ !
आज उमगतय...

ही कहाणी भातुकलीची शेवटी
अधुरीच राहीली !!!



सई
१९|८|०८



मोसम पानगळीचा तळहाताच्या फ़ोडागत जपला ,
वसंताच्या शोधात भेटलास तु...वाटलास आपला !

वाटेवरल्या काट्यांची फ़ुले हारात गोवली ,
नवखेपणाची नवलाई अंतःकरणास भावली !

बेईमानी प्रितीतली मात्र नाही साहवली ,
धगधगती मशाल प्रतारणेची हाती नाही धरवली !

झाकोळलेले आकाश सुध्दा कोसळून निरभ्र होत गेलं ,
तुझ्या प्रेमासाठी आसुसलेलं मन मात्र विरक्त होत गेलं !

प्रत्येक दगाबाजी तुझी शेवटची मानुन पाहीली ,
निकराने मांडलेली भातुकली अर्धी-अधुरीच राहीली !

आजही आठवतोय रे तो प्रसंग ...जस्साच्या तस्सा ! बरोब्बर एक वर्ष उलटलेलं...

सगळ्या भेटींमधली आजची भेट खूप खआआआआस होती आपल्यासाठी !

तू नेहमीच्या ठिकाणी,तळ्यावरच्या पुलापाशी बोलावलेलंस. माझा वाढदिवस आणि आपल्या लग्नाचाही...पहिला-वहिला ! म्हणाला होतास एक खास 'गिफ़्ट' आणतोय !!

मी वेळेआधीचं हजर... अन तू... नेहमी प्रमाणेच लेटलतिफ़ !!! आल्या-आल्याचं गुलाबाचं फ़ूल देऊन म्हणालास... डोळे मिट राणी एक सरप्राईज !!!

ऐकेचनास अजिबात....

.

.

.

.............धप्प !!!

गटांगळ्या खाणारी मी ..

अंधार ...अंधार...खोल...खोल...

आणि जेव्हा खऱ्या अर्थाने डोळे उघडले

तेव्हा...तेव्हा...

एकलीच होते !!!



सई
२०/५/०८



ना टाकाऊ होते , ना विकाऊ होते,
व्यवहारी जगात मात्र शिकाऊ होते !

तत्वनिष्ठ, स्पष्टवक्ती, सत्यप्रिय होते,
दर्पणी मीच माझ्या निष्कलंक होते !

नित्य-नवे घाव निमुट सोशीत होते,
मीठ चोळणारेच इथे आसपास होते !

भोगिल्या व्यथांची कात टाकीत होते,
कुण्या काळचे नीर नेत्रात होते !

ईंच-ईंच जिंदगी लढले जरी मी,
धारातीर्थी रणांगणी एकलीचं होते !!!

मला अगदी लहानपणापासून माणसांचं भारी वेडं ...

आई एक आदर्श शिक्षिका, तिच्या शाळेमुळे नि मी घरातलं पहिलचं नातवंड असल्याने अडीअडचणीला आमची रवानगी आजोळीचं... मामा-माम्या, आजी-आजोबा, मावश्या या सग़ळयांच्या लाडाकोडात बालपण गेलेलं...

कोणतीही बारीक-सारीक गोष्ट धावत जाऊन मी पहिल्यांदी आजीच्याचं कानावर घालत असे...माझ्या चुका,मागण्या सगळ्या आजीच्या मध्यस्थीनेच सर्वांसमोर येत. आताही मी हेचं ठरवल होतं की हे सगळं एकदा आजीला सांगीतलं की मी मोकळी...

ती नेहमी म्हणे...सईला नं आमच्या खटल्याचचं घर बघुन द्यायला हवं ...मोठं माणसांचं वेडं आहे या पोरीला...

पण नक्की कुठं हरवलीत रे ही माणुसकी जपणारी माणसं ?

अं ?

आपण यांना पाहिलतं का ?

सई
३१/८/०८



धर्म-न्याय-नितीमुल्य पाळणारी माणसं ,
तटस्थ, व्रतस्थ, एकनिष्ठ राहणारी माणसं !

तत्वनिष्ठ, कर्मनिष्ठ, ध्येयवेडी माणसं ,
तळहाती शिर घेवून प्रसंगी धावणारी माणसं !

उच्च-निच भेद-भाव न मानणारी माणसं ,
सत्यासत्याची योग्य चाड बाळगणारी माणसं !

उत्तुंग गिरीशिखरापरी अचल ती माणसं ,
मंद-मंद समईपरी तेवणारी माणसं !

आपण यांना पाहिलतं का? हरवलीत ही माणसं ,
माणसातली माणुसकी जपणारी माणसं !





निलु आली होती आज सकाळी...सकाळी ... आईलाही औषध आणायला आणि डिसचार्जचे पेपर तयार करायला जायचचं होतं... आई गेली नि निलु रडायलाचं लागली ढसाढसा एकदम....बर काय झालं ते सांगायलाही तयार होईना वेडी ...आणि...आणि...जे ऐकले ... वाटत होत डोक्यात घणाचे घांव पडतायत एकावर एक !!!


कालच साखरपुडा झाला होता तुझा...अगदी थाटामाटात ! मुलग़ी सुंदर होती म्हणे नक्षत्रासारखी... आणि पार्टीही गडगंज !

काही अंशी घरचा दबाव...आणि बराचसा तुझा स्वार्थ !!!

मीच उरलेय मागे...

निर्माल्यासारखी !!!

मु
२२/८/०८



ऐरी -गैरीच मिरवतेय मालकीणीसारखी ...
जीवनी तुझ्या मीच आश्रीतासारखी !

येणे-जाणे तयांचे नित्याचीच वावटळ ...
पूर्तता केली मी --------रिक्त जागेसारखी !

लाजवलेस तु रंगबदलत्या सरड्यासही ...
राहिले स्थितप्रज्ञ मी घोरपडीसारखी !

रामबाण उपाय तुझे धन्वंतरीसारखे ...
हुळहुळतेय अजुनही सलत्या वेदनेसारखी !

कशाला कारणे-दाखवा नोटीशा बजावू मी ?
युक्तीवाद - मखलाशी तुझी वकीलांसारखी !

नित्य-नव्या फुलांवरील मनमौजी मिलिंद तु...
सुगंधीत अजुनही मी निर्माल्यासारखी !!!



आईला दारात पाहुन मात्र माझ्या पायाखालची जमीनच सरकली...

कारण...

कारण...निलुचं बोलणं... नि मी दिलेला पुढचा सगळा वृतांत तिच्या कानावर पडला होता.. औषधाचे विसरलेले प्रिस्क्रीप्शन घ्यायला परत आली होती ती...

अन...


अन... तिच्या शाश्वत मिठीत माझी शुध्द हरपली !!!

भानावर आले...पहाते तर आई-बाबा जवळच बसलेले माझ्या.. बाबांचा पाठीवरुन फ़िरणारा प्रेमळ हात...काहीही न बोलताच सारे काही सांगुन जात होता. जणू विचारत होते दोघेही...

वेडाबाई !

असे जगतात का कोणी ???

23/८/०८



टाळीले पदोपदी हरएक फुलाने म्हणून...
निखाऱ्यांवर मार्गक्रमण करतात का कोणी ?

बहकला रस्ता...चालणे क्रमप्राप्त तरीही ...
होश बेहोशीत शोधतात का कोणी ?

जग़ाचे काय? बोलते...असेही...तसेही !
स्वतःहून गाळात रुततात का कोणी ?

जो-तो माहिर भरण्या गल्ले स्वतःचे...
सतित्व स्विकारुन झुलसतात का कोणी ?

भोगिल्या व्यथांची ही अशी-कशी ऊतराई ...
स्वतःवरच अचुक नेम धरतात का कोणी ?

श्वास-श्वासास जोडते वेदना कधीची ...
अप्राप्य ईच्छामरण म्हणून जगतात का कोणी ???

मनाने थकले-भागलेले आम्ही त्याच संध्याकाळी डिसचार्ज मिळून घरी परतलो ...

मी आपल्या खोलीत परतले ते एका ठाम निश्चयानेचं , झाल्या गोष्टींवर पडदा पाडायचा आता...



एक दुःखद स्वप्न समजुन विसरायचे सारे काही...

खूप-खूप शिकायचे पुढे...
नि प्राण गेला तरीं बेहत्तर !

पण..

पण आई-बाबांशी प्रतारणा नाही करायची...चुकुनही...कधीही !!!

झाली पहाट झाली !!!

सई
२४|८|०९

तीच कातरवेळ...एकलेपण...बघ रातही आली...
सावलीही माझी रुसुनी अवचित परागंदा झाली !

आर्त-आर्त वेदनेची धारही आता बोथट झाली...
बालपणींच्या सुखद आठवांची साय दाट झाली !

ग्रीष्म ऊन्हाला लपेटुन मी चांदण्यात नहाली ...
संघर्षाची केली गाणी...नि तालासुरात गायली !

नवी क्षितीजे ...नव्या आकांक्षा...नव्याने साद घाली...
पदोपदीच्या हरएक काटयांची सुगंधी फ़ुले जाहली !

ओहोटीच्या मागावरती बघ भरती ही आली...
सोन-साजिरी , गोड-गोजिरी झाली पहाट झाली !!!





आठवडा होऊन गेला घरी परतुन...

हळु हळु प्रत्येकजण आपापल्या रुटीनला सरसावले...

बाबांनी आवडीच्या पुस्तकांनी माझं शेल्फ़ भरून टाकलेलं... हॉस्पिटल... चेक-अप...औषध सगळ्यातून सुटले मी एकदाची!

आणि एके सकाळी मी माझा परत कॉलेजला जाण्याचा निर्णय जाहीर केला...आई-बाबांनी स्वागतचं केले त्याचे !!!

त्या दोघांच्या डोळ्यातला अजुनी असलेला माझ्या बद्दलचा तो अगाध विश्वास पाहुन मात्र मलाच गलबलुन आलं !

आणि...
आणि...मी मनोमन पक्क ठरवून टाकलं....

दर्पणी न्याहाळणे नाही !!!

सई
३१/८/०९



तीचं ती वाट पुन्हा चालणे नाही ,
भूतकाळी आता रेंगाळणे नाही !

गांव तो आठवांचा राहीला मागे ,
आज त्या आठवांना चाळणे नाही !

वादळे सोसली,ना वाकली फ़ांदी ,
लाजरी वेल ती सांभाळणे नाही !

रात गेली सुनी नाही गं चंद्रमा ,
रातराणी सुगंधी माळणे नाही !

कुंकवाचा टिळा भाळी गं ल्यालेला ,
भंगल्या दर्पणी न्याहाळणे नाही !

आज या घटनेला वर्ष उलटून गेलेय....

मी माझी डिग्री घेतलीय..पोस्ट ग्रॅज्युएशनच्या विचारात आहे.



तुझ्यावर केलेली कायदेशीर कारवाई हा कसल्याही वैयक्तिक आकसाचा भाग नसून माझ्या सारख्या असंख्य मुलींना ती एक प्रेरणाच ठरेल !!!

एक गोष्ट मात्र गाठीशी बांधुन घेतली सगळ्या प्रकरणातून, कितीही कठीण प्रसंग आले तरीही...घरच्यांची भरभक्कम साथ असेल ,संस्काराची शिदोरी बरोबर असेल आणि जिद्दीची कास धरली तर सत्याचाच विजय होतो... शेवटी !!!

८।८।१०

किर्रर्र काळी रात्र होती मी ही होते एकटी ,
रात वैऱ्याचीच होती उध्वस्त माझी राहुटी !

टिपुर नव्हते चांदणे अन मातलेला चंद्रही ,
घोंघावणाऱ्या वादळी त्या नांव होती संकटी !

द्युत होता मांडलेला फ़ासे उतरती गळी ,
यावे कुणीही , टिचकवावी माझीचं का रे सोंग़टी !

लांडग्यांची फ़ौज मागे... नागमोडी वाटही ,
स्थितप्रज्ञ मी शिळेपरी, ना उलंघणे त्या चौकटी !

लखलखली दामिनी ...अन भस्म झाले क्षुद्रही ,
सत्य-असत्याच्या रणी...सत्यचं जिंके शेवटी !!!



# अभिप्राय..........

“ तळयात कि मळयात...”
“तळयात कि मळयात...”
कलती मान झोकदार
कमरेवर हात... आपल्याचं तोऱ्यात !

अजूनी आठवतयं सुप्रिया, सईची वही वाचताना...या सुरवातीवरच मी थबकले होते, एक अंधुकशी स्वतःच्याच तो-यात उभी असलेली सई दिसली होती मला तेव्हाही ... पण जसजशी पुढे वाचत गेले..तुटत गेले... ग़ आतल्या आत...

सुप्रिया, आपण एकमेकांना ओळखतो, भेटही झालीय आपली, आणि ब-याचदा चर्चाही होते आपल्यात , पण तुझी सई...अस वाटलं , हिला तर मी खुप आधीच भेटलेय...खुपशी जवळुन...कुठल्यातरी वळणावर..पण...पण.. तेव्हा माहिती नव्हती गं ...तिची परवड, तिचा आकांत, आणि उरी फुटून धावणं...फ़सव्या स्वप्नामागे .

तु तिला ...रेखाटलसं... जिवंत केलसं...अन मीही रडले... तिच्या सोबतीला नाही गं...उलट हलक केलं तिने मला पण तु तिला पुन्हा उभं केलस आणी जिवात जिव आला बघ. ही कहाणी फ़क्त समस्त स्त्री वर्गाची नसून ज्याला वेदना कळतात त्या प्रत्येकाला हेलावून टाकणारी आहे.

तुझे शब्द, कविता, गझला...तुझ्या लिखाणाविषयी अजून वेगळे काय लिहू? ...निव्वळ अप्रतिम! एक सांगू? सई भाग्यवान आहे कारण तुझे शब्द मिळालेत तिला.....

पुढील लिखाणास खुप खुप शुभेच्छा !!!

तुझीच,
**ममता रियाज़ (सपकाळ)**

# अभिप्राय..........

"सईची वही.......... काही पानं निखळलेली....."

सईची वही वाचून खूप वेळ मन सुन्न होतं---------- प्रत्येकालाच आयुष्यात कडू-गोड प्रसंगांचा सामना करावा लागतो, पण प्रामाणिकपणे विश्वास ठेवणा-यांच्या वाटयाला येणारी ही अशी प्रतारणा खूप हेलावून टाकणारी असते. अशा घटना एखादयाला आयुष्यातून उठवतात.

अशा आठवणी कितीही जिवघेण्या असल्या तरी सावरावं लागतचं म्हणून एक स्त्री म्हणून सई अगदी मनाला स्पर्शून गेली कारण तिने स्वतःला सावरलं आणि नुसतच सावरल नाही तर त्या व्यक्तिला त्याची शिक्षा दिली त्यामुळे तिची सर्व कथा मनावर कोरली गेली !

कवयित्रीचे विशेष अभिनंदन !

एका दुस-या स्त्रीची व्यथा, कविता गझल आणि कथा अशा स्वरुपात मांडायला लेखणीत खूप सामर्थ्य लागतं...

अशीच लिहीत रहा !

**रेणूका (रेपाळ) खटावकर**

प्रकाशक आणि वितरक

ई साहित्य प्रतिष्ठान

नवीन मराठी साहित्यिकांना व्यक्त होण्यासाठी एक नवीन व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा आमचा प्रयत्न आहे. आपण या नवीन ई साहित्य यज्ञात सामिल व्हावं असा आमचा आग्रह असतो. ई बुक्स हे साहित्याचं भविष्य आहे. इंग्रजीत पाच लाखाहून अधिक ई बुक्स आहेत. तर मराठीत शंभराच्या आत बाहेर. हे चित्र बदलायचंय. यासाठी आपण आमच्याशी संपर्क साधावा. कळावे लोभ असावा.

आपला निमंत्रक

**ई-साहित्य प्रतिष्ठान - esahity@gmail.com – ९८६९६७४८२०**

www.esahity.com

ई-साहित्य प्रतिष्ठानची इतर विनामूल्य ई-नियतकालिके
ई-स्टाप, स्वरनेटाक्षरी ऑडियो अल्बम, बालनेटाक्षरी

: प्रसिद्ध झालेली ई-बुक्स :

- टल्लीची शाळा
- मकरंदच्या त्रिवेण्या
- ग्रेव्हयार्ड लिटरेचर
- चार क्षण
- तो आणि ती
- प्रियेचे अभंग
- देशी दारुचे दुकान-3D
- ई-शाळा
- तो, मी आणि सिगरेट
- लोकल गोष्टी
- मोरया
- मीरा (अनुवाद)
- ऑथंब
- सावळ्या मुलीची गाणी

मुखपृष्ठ डिझाईन, मांडणी व सजावट

भारती सरमळकर

Last Bench Designs
(where creativity begins)

LBD